## —:: कार्यालयीन आदेश ::—

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण २०२०/प्र.क्र. २५/ आस्था-५, दिनांक २२ जानेवारी २०२० अन्वये दिलेल्या निर्देशांनुषंगाने नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील सर्व आस्थापना प्रमुख न्यायिक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमापूर्वी भारताच्या संविधानातील उद्देशिका (सरनामा) / Preamble यांचे सामुहिक वाचन करण्यात यावे.

जिल्हा न्यायालय, नांदेड )

दिनांक १० जानेवारी, २०२५ )

( सुरेखा कोसमकर )
**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**

---

**पृष्ठांकन क्र./ आस्था/ 362 /२०२५.**

प्रति,

- जिल्हा न्यायाधीश - १, नांदेड / बिलोली / कंधार / भोकर / मुखेड यांना आपआपल्या मुख्यालयी कार्यरत सर्व न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांच्या निर्दशनास प्रस्तुत आदेश आणून देण्याच्या विनंतीसह.
- जिल्हा न्यायाधीश - २ /३, नांदेड
- न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, नांदेड
- तदर्थ जिल्हा न्यायाधीश - १, नांदेड / बिलोली / भोकर
- अति. सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड (१)
- दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड ( आस्थापनेशी संलग्न सर्व न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास प्रस्तुत आदेश आणून देण्याच्या विनंतीसह. )
- मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड ( आस्थपनेवर कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास प्रस्तुत आदेश आणून देण्याच्या विनंतीसह )
- सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड ( आस्थापनेवर कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास प्रस्तुत आदेश आणून देण्याच्या विनंतीसह.)
- दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माहुर / किनवट / हिमायतनगर / हदगांव / अर्धापूर / लोहा / देगलुर / नायगाव बा. / मुदखेड / उमरी / धर्माबाद.
- जिल्हा सरकारी वकील, नांदेड.
- सहाय्यक संचालक तथा पोलीस अभियोक्ता, नांदेड.

- अध्यक्ष, अभियोक्ता संघ, नांदेड.
- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- सहाय्यक अधिक्षक, वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- जिल्हा प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, नांदेड ( जिल्हा न्यायालयाच्या संकेत स्थळावर अधिसूचीत करणेकामी.)
- जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर लावले जावे.
- जिल्हा न्यायालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी माहिती मिळाल्याबाबत स्वाक्षरी करावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड )
दिनांक १० जानेवारी, २०२५ )

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड
10.01.2025

दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी ध्वजारोहन कार्यक्रमापुर्वी भारताच्या संविधानामधील उद्देशिका / Preamble याचे सामुहिक वाचन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०२०/प्र.क्र.२५/आस्था-५
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
तारीख: २२ जानेवारी, २०२०

**शासन परिपत्रक :-**

भारताची राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर ,१९४९ रोजी स्वीकारण्यात आली. या निमित्ताने प्रत्येक वर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो . संविधान दिनांक २६ जानेवारी,१९५० पासून अंमलात आले असून भारतीय संविधानाची पुरेशी माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे . भारतीय राज्य घटनेतील मुलतत्त्वांची व्याप्ती व सर्व समावेशकता सर्व नागरिकांना समजावी आणि त्याचबरोबर घटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता ही मुलतत्वे समाज मनावर कोरली जावीत यासाठी संविधानाचा परिपूर्ण परिचय नागरिकांना होणे आवश्यक आहे . भारतीय संविधानातील मुलतत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारी असून नागरिकांच्या मनात याची रुजवणूक झाल्यास जबाबदार, सुजाण व सुसंस्कृत नागरिक घडविण्यास मदत होईल.

२. त्यामूळे दिनांक २६ जानेवारी, २०२० पासून दरवर्षी होणाऱ्या ध्वजारोहन कार्यक्रमापुर्वी भारताच्या संविधानांमधील उद्देशिका (सरनामा) / Preamble याचे सामुहिक वाचन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००१२०१३११०८७४२० असा आहे . हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

PANDIT
KAHANDERAO
JADHAV

Digitally signed by PANDIT KAHANDERAO JADH
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=130c3faa5ebf138c8b39058785ac534c77a1b84b0b4d591d63ea56da06, postalCode=
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=f5c40942371a6969108d4d7e80
5f7a19f482726930e17fe1f06ad5cc76, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PANDIT KAHANDERAO JADHAV
Date: 2020.01.22 15:14:17 +05'30'

(पं. खं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, सर्व विभाग,
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
३. गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती.

गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती यांना सुचित येते की, सदर बाब सर्व ग्राम पंचायतींच्या निदर्शनास आणण्यात यावी.

परिशिष्ट-१

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

-----